माजी परिविक्षाधीन व मुक्तबंदी यांना त्यांचे पुनर्वसनासाठी आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : पीओए-०२९३/२[२७]/पीआरएस-२,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक : १६ जून, १९९३.

वाचा :- १] शासन निर्णय, गृह विभाग,क्र. पीओए-०२७२/१[२६]/जे, दि. ३ ऑगस्ट ७७
२] संचालक, सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. संसुजे/बाजहु/अनुदान/१९९२-९३/पीओअे-२, दि. ३.२.१९९३.

शासन निर्णय :- शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीओए-०२७२/१[२६]/जे, दिनांक ३ ऑगस्ट, १९७७ अन्वये संचालक, सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माजी परिविक्षाधीन व मुक्तबंदी यांच्या पुनर्वसनासाठी रुपये ५००/- पर्यंत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार आहेत. त्यापुढील अधिकार शासनास असल्याने परिविक्षाधीन श्री. बापू जयसिंग कुडे यांना मोटार गाडीची दुरुस्तीचे व्यवसायासाठी लागणारी हत्यारे खरेदी करण्यासाठी रु. २०००/- [रुपये दोन हजार फक्त] एवढे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यास शासन या आदेशाद्वारे मंजूरी देत आहे.

२. ह्यासाठी होणारा खर्च "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-१०६-सुधारसेवा-१०६ [एक] सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना-४१- सहाय्यक अनुदान/अंशदान/अर्थसहाय्य" ह्या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो १९९३-९४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-२९८/९३/व्यय-८, दि. २६.५.१९९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[अ. ल. पाटील]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

...२/-

प्रति,

संचालक, सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
जिल्हा परिविक्षा अधिकारी, मुंबई,
जिल्हा परिविक्षा अधिकारी, अपराधी परिविक्षा अधिनियम, कोल्हापूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा परिक्षा], मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा ~~[illegible]~~ परिक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, व्यय-८,
निवड नस्ती.

—x—